शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे**

७०८,आर. बी.कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठमहाराष्ट्र शासन

पुणे-४११०३०.

संपर्क क्रमांक (०२०)२४४७८१२२ ईमेल: sqaafmh@maa.ac.in

**प्रति**

**प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)**

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प.(सर्व)**

विषय: शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF) बाह्य-मूल्यांकन अंतिम मुदत वाढ देणेबाबत...

संदर्भ :१.शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२४/प्र.क्र.०९/एसडी-६ मंत्रालय मुंबई दि.१५ मार्च,२०२४ (SSSA)

२. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२४/प्र.क्र.१०/एसडी-६ मंत्रालय मुंबई दि.१५ मार्च,२०२४ (SQAAF)

३ .शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा -SQAAF बाबतची माहिती लिंकमध्येभरण्याबाबत पत्र जा.क्र. राशैसंप्रपम/मूल्यमापन/SQAAF/२०२४-२५/००५८२ दि: ०३.०२.२०२५

४.पत्र जा.क्र. राशैसंप्रपम/८७/२०२५-SSSA I/१३१३९२१/२०२५दि: ०४.०७.२०२५

५. पत्र जा.क्र. राशैसंप्रपम/SCERT/141/2025-SSSA/I/1351205/2025/दि.३१.०७.२०२५

६.पत्र जा.क्र. राशैसंप्रपम/SCERT-५१.०/१६/२०२५- SSSA/I/१५४७६७९/२०२५दि.१८.११.२०२५

७. पत्र जा.क्र. राशैसंप्रपम/SCERT-५१.०/२६/२०२५- SSSA/I/१५८४२७४ /२०२५ दि.०६.१२.२०२५

उपरोक्त संदर्भ क्र. ०१ च्या शासन निर्णयान्वये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथे राज्य शाळा मानक प्राधिकरण (SSSA) कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. संदर्भ क्र. ०२ च्या शासन निर्णयान्वये शाळा गुणवत्ता आणि आश्वासन आराखडा (SQAAF) तयार करण्यात आला आहे. संदर्भ क्र. ०२ ला अनुसरून राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या (शासकीय, खाजगी अनुदानित व खाजगी विनाअनुदानित किंवा स्वयं-अर्थसहाय्यीत), सर्व माध्यमाच्या शाळांचे स्वयं-मूल्यांकन (१००% शाळा), बाह्य-मूल्यांकन (स्वयं-मूल्यांकनातील १००% शाळांपैकी एकूण ५% शाळा) व त्रयस्थ पक्षाकडून मूल्यांकन (५% शाळांच्यापैकी १०% शाळा) करण्यात येणार आहे. त्यानुसार संदर्भ क्र. ०३ ने स्वयं-मूल्यांकन ची प्रक्रिया सुरु करण्यात आली होती व दि: ३०.०६.२०२५ पासून स्वयं-मूल्यांकनाची लिंक बंद करण्यात आली आहे. स्वयं-मूल्यांकनाचा टप्पा पूर्ण केल्यानेत्यानंतर बाह्य-मूल्यांकनाचा टप्पा सुरु करून पूर्णत्वास आणणे अपेक्षित आहे.

. करिता, संदर्भ क्र. ४ ने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये स्वयं-मूल्यांकन पूर्ण केलेल्या शाळांचे बाह्य-मूल्यांकन हे दि.३१ जुलै, २०२५ पर्यंत पूर्ण करून घेण्यासाठी सूचित करण्यात आले होते.संदर्भ क्र.५,६व७ च्यापत्रान्वये अनुक्रमे ३०ऑगस्ट२०२५,१५डिसेंबर२०२५ व दि २२ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. दि.२०.१२.२०२५ रोजीच्या अहवालानुसार बाह्य मूल्यांकनासाठी निवडण्यात आलेल्या १०७१२ शाळांच्यापैकी ९९६८ शाळांचे (९३.०५%) बाह्य मूल्यांकन पूर्ण झाले असून अद्याप ७४४ शाळांचे (६.९५%) बाह्य-मूल्यांकन अपूर्ण आहे. शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक यांनी मुदतवाढ देणे बाबत या कार्यालयास कळविण्यात आले आहे.

**तरी यापत्राद्वारे आपणास कळविण्यात येते कि, आपल्या जिल्ह्यातील निवड पात्र शाळांचे बाह्य मूल्यांकन करण्यासाठी दि.३१ डिसेंबर २०२५ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. आपल्या जिल्ह्यातील निवडपात्र शाळांचे बाह्य-मूल्यांकन विहित कालावधीत १००% होईल याची दक्षता घ्यावी.**

Digitally signed by
RAHUL ASHOK REKHAWAR
Date: 24-12-2025
19:15:16

(राहूल रेखावार,भा.प्र.से.)

संचालक

राज्य शैक्षणिक संशोधन व

प्रशिक्षणपरिषद, महाराष्ट्र, पुणे.

प्रत माहितीस्तव:-

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. आयुक्त(शिक्षण),शिक्षण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.
३. मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद, मुंबई